**(दिनांक १ डिसेंबर २०२२)**

# जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे जनजागृती विषयक कार्यक्रम

वडाळा:- गतवर्षीप्रमाणे यावर्षीही जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडाळा येथे विद्यार्थ्यांसाठी एड्स या रोगाबाबतचे जनजागृती विषयक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये एड्स रोगांची लक्षणे, निदान, उपचार तसेच रोग जडण्याची कारणे, उपाय, लैंगिक शिक्षण काळाची गरज या महत्त्वपूर्ण मुद्द्यावर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर कार्यशाळेमध्ये उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निदेशक श्री संभाजी जाधव सर यांनी केले व आभार प्रदर्शनाचे कार्य निदेशक श्री रणजीत गाडे सर यांनी केले.




दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून पाळला जातो. जगभर पसरलेल्या एड्स या जीवघेण्या रोगाबद्दल जगभर जनजागृती व्हावी आणि या रोगामुळे मरण पावलेल्यांचा शोक वक्तकार्यासाठी हा दिवस पाळावा असे संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केले आहे. सरकारी आणि आरोग्य अधिकारी,

अशाशकीय संस्था आणि जगभरातील व्यक्ती एड्स प्रतिबंध आणि नियंत्रणावरील शिक्षणासह हा दिवस साजरा करतात.
एड्समुळे जगभरात २.८९ कोटी ते ४१.५ कोटी लोकांचा मृत्यू झाला आहे आणि अंदाजे ३.६७ कोटी लोक एचआयव्ही सह जगत आहेत, ज्यामुळे हे अभिलिखित इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या जागतिक सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक आहे.